# प्रकरण पाचवे

# प्रकरण ५
# निष्कर्ष आणि सूचना

## ५.१ प्रस्तावना

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांचा विचार करता कोल्हापूर जिल्हा हा जास्तितजास्त शेतीवर अवलंबून आहे. आणि येथिल शेती ही मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. म्हणून कोल्हापूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास झालेला नाही. त्यासाठी शेती पूरक व्यवसाय, छोटे उद्योग सुरू करणे गरजेचे आहे. कागल तालुक्याचा विचार करता अंत्योदय व दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या संख्येत घट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात संधी आहेत. कारण केशरी कार्डधारकांच्या मानाने त्यांची संख्या कमी आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेने पुरेशा प्रमाणात व चांगल्या दर्जाचा धान्यपुरवठा केल्यास कागल तालुक्यातील दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल

कागल तालुक्यतील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण चित्र पहाता आर्थिक दृष्ट्या कमकुवत कार्डधारकांना आवश्यक वस्तू कमी किंमतीत पुरविण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडली आहे. तथापि या कार्डधारकांना तांदूळ आणि गहू या दोनच महत्वाच्या वस्तूंचे वाटप केले जाते. तर रॉकेल पुरवठा ही पुरेशा प्रमाणात केला जात नाही. तसेच पुरवठा केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किंमतीत तालुक्यात चढ-उतार आढळून आले आहेत. म्हणून कार्डधारक ज्या वस्तू स्वस्त दरात रेशन दुकानातून मिळत नाहीत अशा वस्तू किरकोळ दुकानातून खरेदी करतात. अशा प्रकारे कार्डधारकांना चांगल्या दर्जाच्या, पुरेशा प्रमाणात, वेळेवर आणि नियंत्रित किंमतीत वस्तूंचा पुरवठा करण्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेला अपयश आले आहे.

### ५.२.१ किंमतीतील चढ-उतार

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे महत्वाचे कार्य म्हणजे कार्डधारकांसाठी किंमतींना आधार देण्याचा कार्यक्रम म्हणून काम करणे तथापि, रेशन धान्य दुकानातून पुरविल्या जाणाऱ्या वस्तूंच्या विशेष म्हणजे तांदूळ आणि गहू यांच्या किंमतीमध्ये चढ-उतार आहेत आणि कागल तालुक्यातील विविध रेशन दुकानातून वस्तूंना आकारल्या जाणाऱ्या दरामध्ये फरक आहे. याचा परिणाम विशेषतः पिवळे व अंत्योदय कार्डधारकांच्या खरेदीशक्तीवर झाला आहे.

### ५.२.२ अनियमित आणि अयोग्य वितरण

संपूर्ण कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका पाहिली असता विविध कार्डधारकांना वस्तूंचा केला जाणारा पुरवठा अनियमित आणि अयोग्य आहे असे आढळून आले. तसेच दुसऱ्या बाजूला दारिद्र्य रेषेखालील व अंत्योदय योजनेतील कार्डधारकांना अनुक्रमे गहू २० किलो व २२ किलो तर तांदूळ १५ किलो व १३ किलो पुरवठा केला. तसेच हा पुरवठा १०० टक्के असतो. मात्र वस्तूस्थिती पहाता कागल तालुक्यात पिवळ्या कार्डधारकांना १७ किलो गहू व १३ किलो तांदूळ तर अंत्योदय कार्डधारकांना २० किलो गहू व १२ किलो तांदूळ पुरविला जातो. तर केशरी कार्डधारकांना तांदूळ व गहू ५-५ किलो इतकाच मिळतो. तांदळाचे आणि गव्हाचे कार्डधारकांना ठरवून दिलेले प्रमाण आणि सर्व प्रकारच्या कार्डधारकांना मिळणारे अन्नधान्य यामध्ये बराच फरक आहे असे आढळून आले आहे.

### ५.२.३ रॉकेलचे प्रमाण

रॉकेलची विभागणी/वितरण विचारात घेणे फार महत्वाचे आहे. सरकारकडून सर्व प्रकारच्या कार्डधारकांना रॉकेलचे प्रमाण समान ठेवले आहे. मात्र हे प्रमाण फार अल्प आहे. कागल तालुक्यातील प्रति कुंटुंबाला २ ते ३ लिटर रॉकेल मिळते. असे जास्तितजास्त खेड्यात आढळून आले आहे. म्हणून लोक खुल्या बाजारातून रॉकेल खरेदी करतात असे दिसून आले.

## ५.२.७ कार्डधारकांचे वर्गिकरण

संशोधन करीत असताना संशोधकाला कागल तालुक्यात कार्डधारकांची जी विभागणी झाली आहे, जसे केशरी कार्डधारक (APL), पिवळे कार्डधारक (BPL) व अंत्योदय योजनाधारक यांची ही जी विभागणी झाली आहे ती अयोग्य झाली आहे. निकष योग्य लावले गेले नाहीत. ज्याची जमीन पाण्याखाली आहे, ज्याचे उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त आहे अशा काही लोकांची दारिद्र्य रेषेखाली नोंद झाली आहे. या व्यक्ती रेशन धान्य दुकानातून मिळणाऱ्या धान्याचा अथवा एखाद्या सरकारी योजनेचा फायदा घेताना दिसून आले आहेत. म्हणून कार्डधारकांची विभागणी ही योग्यरित्या झालेली नाही.

## ५.२.८ कार्डधारकांमधील एकता

कागल तालुक्यात जवळ जवळ ६७.३ टक्के कार्डधारकांना पुरेशा प्रमाणात अन्नधान्य मिळत नाही असे दिसून आले आहे. मात्र एकही कार्डधारक रेशन दुकानदाराकडे अथवा तालुका विभागाकडे तक्रार करित नाही. त्यामुळे कार्डधारकांची संघटना आहे असे दिसून येत नाही.

## ५.२.९ विविध योजनांची माहिती

भारत सरकारकडून विविध योजना दारिद्र्य रेषेखालील लोकांना व अंत्योदय योजनेच्या लाभार्थींसाठी जाहीर केल्या जातात. मात्र या योजनांची माहिती या सर्व कार्डधारकांना मिळत नाही. राजकिय पुढारी या योजनांचा आपल्या आप्त नातेवाईक, जवळच्या व्यक्ती यांना फायदा करून देतात असे संशोधनात आढळून आले. त्यामुळे या योजनांचा दारिद्र्य रेषेखालील लोकांना फायदा होत नाही.

## ५.२.१० सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे यशापयश

कागल तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेला दारीद्र्य निर्मुलनात पूर्णपणे अपयश आले आहे. समाजातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना

### ५.२.१३ सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका

दारिद्र्य निर्मुलनाबाबत सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विचार करता कागल तालुक्यातील लोकांच्या रहाणीमानाच्या दर्जाचा विचार करणे आवश्यक आहे. जवळ जवळ ६० टक्के कार्डधारकांचा रहाणीमानाचा दर्जा रेशन दुकानातील धान्यामुळे सुधारलेला नाही. याचा अर्थ कागल तालुक्यात दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमात सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका अपयशी ठरली आहे. बरेच कार्डधारक हे दारिद्र्य रेषेखाली आहेत. ज्यांचा रहाणीमानाचा दर्जा उंचावलेला नाही.

### ५.२.१४ मागासवर्गियावरील परिणाम (SC/ST)

मागासवर्गिय लोकाचा विशेष करून SC/ST समाजाचा दारिद्र्य रेषेखाली व अंत्योदय योजनेखाली समावेश केला गेला आहे. परिणामी जे लोक आर्थिक सामाजिक मागासलेले आहेत त्यांच्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. अशा लोकांना सरकारच्या योजनांच्या अनुदानाशिवाय स्वतःच्या विकासाच्या संधी निर्माण होणार नाहीत.

### ५.२.१५ रेशन धान्य दुकानांचे व्यवस्थापन

कागल तालुक्यातील रेशन धान्य दुकानांची परिस्थिती आणि व्यवस्थापन विचारात घेणे आवश्यक आहे. जास्तितजास्त रेशन धान्य दुकानात रेशन दुकानाचा आकार लहान असल्यामुळे तसेच अधिक खर्च टाळणे व तोटा कमी करणेकरीता एखादाच नोकर ठेवला जातो. तसेच व्यवस्थापकाला दिला जाणारा पगार साधारण १००० ते १२०० रु च्या दरम्यान आहे. त्यामुळे या व्यक्ति रेशन दुकानात काम करण्यास तयार होत नाहीत असे आढळून आले.

### ५.२.१६ अनुदान

सरकारकडून रेशन धान्य दुकानांना वहातुकीवरील रिबेट शिवाय कोणतेही अनुदान मिळत नाही म्हणून अन्नधान्याची खरेदी आणि विक्री

अलिकडील काळात यामध्ये सुधारणा होवून सन २००७ मध्ये रेशन धान्य दुकानांना रु २५८७०१.०१ इतका सरासरी फायदा झालेला आहे. याचे कारण म्हणजे सरकारकडून प्रति रेशन दुकान कार्डधारकांची संख्या वाढल्यामुळे पुरवठा वाढविला आहे.

### ५.२.२० राजकारण

कागल तालुक्याची पहाणी करत असताना सार्वजनिक वितरण व्यवस्थेत विविध राजकिय गटांचा हस्तक्षेप होत असल्याचे दिसून आले. आणि हे राजकिय गट रेशन दुकानांची स्थापना, दारिद्र्य रेषेखालील लोकांची यादी, वस्तूंचे वाटप इ. मध्ये हस्तक्षेप करतात असे निदर्शनास आले आहे.

### ५.२.२१ भांडवल

कागल तालुक्यातील २० ते २५ टक्के रेशन दुकाने भांडवाला अभावी तालुक्याकडून मंजूर झालेला कोटा पूर्णपणे उचलू शकत नाहीत असे दिसून आले. त्यामुळे त्या खेड्यातील कार्डधारकांना या अन्नधान्याच्या पुरवठ्यापासून वंचित रहावे लागत आहे.

## ५.३ सूचना

कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील या प्रचंड समस्या जसे रेशन दुकानांचे व्यवस्थापन, अन्नधान्याचे वितरण, सरकारी किंमत धोरण, अन्नधान्याचा दर्जा इ. संपविणे गरजेचे आहे. यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या पुर्नरचनेसाठी धोरणाची गरज आहे. म्हणून संशोधकाने बळकट सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी व कार्डधारकांना योग्य न्याय मिळणेसाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सूचना किंवा उपाय खालील प्रमाणे.

### ५.३.१ सार्वजनिक वितरणातील गळती कमी करणे

सार्वजनिक वितरणातील महत्वाचा मुद्दा म्हणजे अन्नधान्य वितरणातील गळत्या थांबविल्या पाहिजेत. त्यायोगे अन्नधान्याची उणिव टाळणे आणि गरजू

### ५.३.६ वितरणाचा खर्च/वस्तू हातळणी व वहातुक खर्च

सार्वजनिक वितरण व्यवस्थेत वस्तूंचे वाटप रेशन दुकानदार व शेवटी कार्डधारक यांच्या पर्यंत पोहचण्यासाठी वितरणावर होणारा खर्च हा कमीत कमी असला पाहिजे. याचा परिणाम वस्तूच्या अनुदानित किंमती वाढण्यावर होतो. म्हणून हा खर्च कमी करण्यासाठी खेड्यापाड्यात गोडावून बांधून गोडावूनचे जाळे निर्माण करावे. त्यामुळे खेड्यातीलच माल बाजारभावाने खर्च करून अनुदानीत किंमतीत तेथिल आसपासच्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाला पुरवला जावा. त्यामुळे वस्तू हातळणीचा व वहातुक खर्च कमी होईल.

### ५.३.७ योग्य समन्वय व संलग्नता

बळकट सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी सार्वजनिक वितरणामधील घटकांमध्ये योग्य समन्वय व साखळी असायला हवी. शेतकऱ्यांडून प्रत्यक्षपणे माल खरेदी केला पाहिजे आणि त्याचे वितरण रेशन दुकान व शेवटी कार्डधारकांपर्यंत योग्य साखळीने झाले पाहिजे. तसेच सहकाराची ताकद वाढविली पाहिजे जेणेकरून सहकार सार्वजनिक वितरणात महत्वाची भूमिका बजावू शकेल.

### ५.३.८ फिरती स्वस्त धान्य दुकाने

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा पुरेपुर वापर होण्यासाठी केंद्रातून स्थानिक पातळीपर्यंत सरळ साखळी निर्माण करून व संघटना करून फिरत्या स्वस्त धान्य दुकानांची निर्मिती करावी आणि विशेष करून जिथे मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग उद्योग व्यवसायात गुंतलेला असेल अशा ठिकाणी ह्या योजनेवर अधिक भर द्यावा.

### ५.३.९ जिल्हा सांख्यिकी खात्याची भूमिका

रेशन धान्य दुकानाची व कार्डधारकांची खऱ्या परिस्थितीची माहिती होण्यासाठी तसेच एकूण सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माहितीचे ज्ञान

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सरकारने खोटी रेशन कार्ड तपासणी करण्याची जबाबदारी स्विकारावी, खोटी कार्डे रद्द करावीत. तसेच स्मार्ट कार्डासारखी रेशन कार्ड पद्धती तयार करून रेशन कार्ड वाटपातील दुराचार टाळावा.

### ५.३.१३ सार्वजनिक वितरण राजकारणापासून वंचित ठेवावे

सार्वजनिक वितरण व्यवस्थेत राजकारण आणू नये. कागल तालुक्यात विविध राजकिय गट रेशन दुकान व कार्डधारकांच्या मध्ये हस्तक्षेप करताना दिसतात. त्यामुळे ज्या व्यक्तिला सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा फायदा मिळाला पाहिजे तो मिळत नाही. त्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था राजकारणापासून वंचित ठेवली पाहिजे.

### ५.३.१४ भांडवल पुरवठा व्हावा

कागल तालुक्यातील २० ते २५ टक्के रेशन दुकाने भांडवला अभावी तालुक्याहून मंजूर मालाची उचल करू शकत नाहीत. त्यामुळे कार्डधारकांना त्याचा लाभ मिळत नाही. त्यासाठी रेशन दुकानांना भांडवल पुरवठा व्हावा ज्यायोगे त्यांना तालुक्याहून मंजूर मालाची उचल करता येईल.

### ५.३.१५ अन्नधान्याची योग्य साठवणूक पद्धत

कागल तालुक्यात साठवणूक प्रक्रिया योग्य पद्धतीची नाही. त्यामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. गोडावून नेहमी स्वच्छ ठेवली पाहिजेत. घुशी, उंदीर, टोके, किडे, मुंग्या यांच्यापासून अन्नधान्याचे संरक्षण करण्यात यावे. त्यामुळे कार्डधारकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होणार नाही व अन्नधान्याचे नुकसान होणार नाही.

### ५.३.१६ गरीबांचा अधिक फायदा

समाजात अधिकाधिक गरीब व्यक्ती कोणत्या आहेत हे विविध निकष लावून आणि कसून तपासणी करून ओळखून काढून त्यांचा सार्वजनिक